महसूल व वन विभाग

# जिल्हाधिकारी तथा जिल्हादंडाधिकारी यांचे कार्यालय, जळगाव

**(गृह शाखा)**

आकाशवाणी केंद्राजवळ, जळगांव, ता.जि.जळगाव - 425 001

**दुरध्वनी क्रमांक** - 0257- 2220152 **ई मेल** - homebranchjalgaon@gmail.com

---

**वाचले :-** 1. आपत्ती व्यवस्थापन कायदा,2005
2. भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम 1897
3. सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय ,मुंबई यांचेकडील अधिसुचना करोना2020/प्रक्र.58/आरोग्य 5 दिनांक 14 मार्च, 2020
4. आरोग्य सेवा संचालनालय पुणे यांचेकडील पत्र क्र.DHS/Covid 19/National Seco Survey/D-58/15286-304/2020 दिनांक 13 मे, 2020

-----0000-----

क्र दंडप्र-01/कावि/2020/213 दिनांक 14 मे, 2020

**आदेश :-**

ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद सार्वजनिक आरोग्य विभाग, मंत्रालय, मुंबई यांचेकडील पत्र दिनांक 14 मार्च, 2020 अन्वये करोना विषाणू (कोव्हिड 19) चा प्रादुर्भाव रोखण्यासाठी राज्यात साथ रोग प्रतिबंधात्मक कायदा, 1897 हा दिनांक 13 मार्च 2020 पासून लागू करुन खंड 2,3 व 4 मधील तरतूदीच्या अंमलबजावणीसाठी अधिसुचना निर्गमीत करणेत आलेली आहे आणि त्याबाबतची नियमावली प्रसिध्द केली असून जिल्हाधिकारी हे त्यांचे कार्यक्षेत्रात कोव्हिड 19 वर नियंत्रण आणण्यासाठी व त्याचा प्रादुर्भाव रोखण्यासाठी ज्या उपाय योजना करणे आवश्यक आहे त्या करण्यासाठी सक्षम प्राधिकारी म्हणून घोषित करण्यात आलेले आहेत.

आणि ज्याअर्थी, उपोद्घातात नमूद आरोग्य सेवा संचालनालय, पुणे यांचेकडील पत्र दिनांक 13 मे, 2020 अन्वये जळगांव जिल्हयात दिनांक 18 मे 2020 ते दिनांक 22 मे 2020 पर्यत कोव्हिड 19 च्या अनुषंगाने, National Sero Servey केला जाणार असून सदर सर्व्हे करीता येणारे पथक नमूद तारखेच्या एक दिवस अगोदर जळगांव जिहयामध्ये येणार असलेबाबत कळविले असून या सर्व्हे करीता जळगांव जिल्यासाठी नोडल अधिकारी म्हणून जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांना नेमण्यात आले असल्याबाबत कळविले आहे.

आणि ज्याअर्थी, जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव हे कोव्हिड 19 च्या अनुषंगाने जिल्हा प्रशासनामार्फत राबविण्यात येणा-या विविध प्रतिबंधात्मक योजना राबविणेकामी व्यस्त असून त्यांचेवर करोना विषाणू प्रादुर्भाव रोखणेकामी वेगवेगळया जबाबदा-या सोपविण्यात आलेल्या आहेत. तसेच जळगांव जिल्हयात कोव्हिड 19 च्या पार्श्वभूमीवर त्रिस्तरीय आरोग्य व्यवस्थे करीता नियंत्रण व समन्वय साधणेबाबत जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांना विविध कामे पार पाडावी लागतात.

त्याअर्थी, **मी, डॉ. अविनाश ढाकणे, जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष, जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव** आपत्ती व्यवस्थापन कायदा, 2005 अन्वये मला प्रदान करण्यात आलेल्या अधिकाराचा वापर करुन जिल्हा शल्य चिकित्सक, जळगांव यांना सोपविण्यात आलेली कामे, जबाबदा-या व कोव्हिड 19 च्या अनुषंगाने सुरु असलेल्या प्रतिबंधात्मक उपाययोजना बाबत त्यांची व्यस्तता लक्षात घेता सदरच्या **National Sero Servey** साठी येणारे सर्व अधिकारी, कर्मचारी हे जळगांव जिल्हयात आल्यानंतर त्यांना आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा उपलब्ध करुन देणेकामी व संबंधीत सर्व्हे पथकाला सहकार्य करुन समन्वय ठेवणेकामी **संपर्क अधिकारी (Liaison Officer) म्हणून श्री आर.आर.तडवी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव** यांची नियुक्ती करीत आहे.

Scanned with CamScanner

श्री आर.आर.तडवी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांनी सदर सर्व्हे करणारे पथक जळगांव जिल्हयात आल्यापासून सर्व्हेचा कार्यक्रम पूर्ण होई पावेतो संबंधितांच्या संपर्कात राहून त्यांना वेळोवेळी आवश्यक त्या सर्व सोयी सुविधा पुरविण्याची कार्यवाही करावी.

या National Sero Servey साठी आवश्यक त्या सोयी सुविधा उपलब्ध करुन देण्यासाठी येणारा सर्व खर्च जिल्हा शल्य चिकित्सक जळगांव यांनी राष्ट्रीय आरोग्य अभियान (NHM) करीता उपलब्ध असलेल्या निधीतून करावा.

सदर आदेशाचे उल्लंघन अथवा भंग केल्यास सदर बाब ही आपत्ती व्यवस्थापन अधिनियम 2005, भारतीय साथ रोग नियंत्रण अधिनियम, 1897, भारतीय दंड संहिता, 1860 चे कलम 188 नुसार शिक्षेस पात्र राहील.

सदरचा आदेश हा आज दिनांक 14/05/2020 रोजी माझ्या सही व कार्यालयाचे शिक्क्यानिशी दिला असे.

जिल्हा दंडाधिकारी जळगांव

**(डॉ. अविनाश ढाकणे)**
**जिल्हाधिकारी तथा अध्यक्ष**
**जिल्हा आपत्ती व्यवस्थापन प्राधिकरण, जळगांव**

**प्रत :- माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी**

1. मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद जळगांव
2. पोलीस अधिक्षक जळगांव
3. आयुक्त, जळगांव शहर महानगरपालिका जळगांव
4. अधिक्षक अभियंता, सार्वजनिक बांधकाम मंडळ जळगांव
5. उपविभागीय दंडाधिकारी सर्व
6. उपप्रादेशिक परिवहन अधिकारी, जळगांव
7. अधिष्ठाता, शासकीय वैद्यकीय महाविद्यालय, जळगांव
8. जिल्हा शल्य चिकीत्सक, जळगांव
9. कार्यकारी दंडाधिकारी सर्व
10. मुख्याधिकारी, नगरपालिका / नगरपरिषद सर्व

**प्रत :-** श्री आर.आर.तडवी, जिल्हा कार्यक्रम अधिकारी, जिल्हा परिषद, जळगांव यांना माहितीसाठी व आवश्यक त्या कार्यवाहीसाठी रवाना

**प्रत :- जिल्हा माहिती अधिकारी जळगांव** यांनी सदर आदेशाचे स्थानिक वर्तमानपत्रातून विनामुल्य प्रसिध्दी द्यावी.

**प्रत :- जिल्हा विज्ञान व सुचना अधिकारी जळगांव** यांनी सदरील आदेशाचे jalgaon.nic.in या संकेतस्थळावर प्रसिध्दी देण्यबाबतची कार्यवाही करावी.

Scanned with CamScanner